PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 5

# स्वयंसहायता बचत गट आणि महिला सक्षमीकरण

**डॉ. बिराजदार श्रीमंत महादेव**
एम. ए. एम. फील पीएच.डी
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग
शांतारामभाऊ घोलप कला विज्ञान व
गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे
**(महाराष्ट्र) भारत**

## गोषवारा :-

भारतातील अनेक राज्यांमध्ये स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून झालेल्या महिलांचा आर्थिक विकास आश्चर्यजनक आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा फक्त आर्थिक प्रश्न सुटलेला नाही. तर त्याचबरोबर त्यांचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक इ.सारखे विविध लाभ प्राप्त झालेले दिसून येतात. प्रस्तुत शोधनिबंधात स्वयंसहायता बचत गटाचे अर्थ,शोधनिबंधाचे उद्दिष्टे संशोधन पद्धती, स्वयंसहायता गटाची पार्श्वभूमी स्वयंसहायता बचत गटाचे वैशिष्ट्ये,महिला सक्षमीकरणात स्वयंसहायता बचत गटाची भूमिका, बचत गटाचे कार्यपद्धती, बचत गटाची वाटचाल समस्या उपाय योजना इ. सर्व घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## प्रस्तावना:-

भारत हा कृषीप्रधान देश आहे. पुरुषप्रधान संस्कृती देश म्हणून ओळखला जातो. महिलांचा दर्जा कुटुंबात दुय्यम तथा कनिष्ठ मानला जातो. पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंबातील सर्व निर्णय पुरुषच

घेत असतात. भारतात महिलांचा आर्थिक सामाजिक व राजकीय विकासामुळे पंचवार्षिक योजना काळात लक्ष दिले असले तरी ग्रामीण स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा खरा मार्ग स्वयंसहायता बचत गटामार्फत उपलब्ध झालेल्या दिसून येतो. पंचवार्षिक योजना काळात स्वयंसहायता बचत गट व इतर सामाजिक व आर्थिक संघटनेच्या माध्यमातून स्त्रियांना अनेक सोयी उपलब्ध करून देण्याचे ठरवले गेले. सातव्या पंचवार्षिक योजनेत विशेष कार्यक्रम राबवण्यात आले. व ते आजही सुरू आहेत. स्वयंसहायता बचत गटाची भूमिका यावर विश्लेषण करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) महिला सक्षमीकरणात स्वयंसहायता बचत गटाचे महत्त्व पार्श्वभूमी व बचत गटाचा चा अभ्यास करणे.

2) शोधनिबंधाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा अर्थ समजून घेणे.

3) स्वयंसहायता बचत गटामुळे महिलांचा प्रगतीचा अभ्यास करणे.

4) स्वयंसहायता बचत गटामुळे महिलांमध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

5) स्वयंसहायता बचत गटातील समस्याचा अभ्यास करणे व उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनात्मक अध्ययनाकरिता माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यpम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. संबंधित विषयाचे ग्रंथ, दैनंदिन वृत्तपत्रे इ. साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. स्वयंसहायता बचत गटाचे अर्थ :- स्वयंसहायता म्हणजे स्वतःची मदत स्वतः करणे. स्वयंसहायता गट म्हणजे स्वतःची मदत स्वतः करणारा लोकांचा संघ किंवा संघटना होय. यावरील व्याख्यावरून स्वयंसहायता गटाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्वतःची मदत स्वतः करण्यासाठी स्वतः केलेल्या बचतीतून आर्थिक व सामाजिक विकासासाठी कमीत कमी दहा व जास्तीत जास्त वीस व्यक्तीने एकत्र येऊन तयार केलेला समूह म्हणजे स्वयंसहायता बचत गट होय. परस्परांचे सहकार्य आणि सहभाग व कर्तुतासह सातत्याने प्रयत्नशील व कार्यरत असणाऱ्या सदस्याच्या गटाला स्वयंसहायता गट म्हणता येईल.

**स्वयंसहायता बचत गटाची पार्श्वभूमी व महिला सक्षमीकरण:-**

स्वयंसहायता बचत गटाची मूळ संकल्पना ही बांगलादेशातील डॉक्टर महमद युनूस यांच्या मांडलेल्या सूक्ष्म वित्त पुरवठा या संकल्पनेतून उदयास आले. महंमद युनूस यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन  तसेच दुर्बल व आर्थिक दृष्ट्या दारिद्र्याच्या दृष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून भारतात सुद्धा प्रयत्न केले जात आहे. महाराष्ट्रात स्वयंसहायता बचत गटाच्या उपक्रमामध्ये विविध बँका, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, नाबार्ड सरकारच्या विविध योजना इ.योगदान आहे. स्वयंसहायता बचत गटाचे उपक्रम विशेषतः महिला सक्षमीकरणात व महिलांचा आर्थिक सामाजिक व राजकीय विकासात स्वयंसहायता बचत गटांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते. बांगलादेशातील गरिबी दूर करण्यासाठी व कुटुंब आत्मनिर्भर बनवण्यासाठी डॉक्टर महंमद युनूस यांनी बचत गट हे माध्यम लोकांच्या हाती सोपवले आहे. याच धरतीवर भारतामध्ये 1990 च्या दशकात केंद्र सरकार आणि राज्य सरकार नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम विकासाच्या योजना राबवल्या जात आहेत. छोट्या छोट्या रकमेचे कर्ज सुद्धा गरीब व्यक्तींच्या जीवनात आर्थिक बदल घडवू शकतात याचा अनुभव त्यांनी घेतला आणि बांबू पासून टोपल्या बनवणाऱ्या कारागिरांच्या वस्तीत त्यांनी दहा महिलांचा बचत गट स्थापन केला. परंतु त्यांना तारण शिवाय कर्ज मिळू शकत नव्हते. याची त्यांना जाणीव झाली. आणि सन 1982 मध्ये त्याने महिलांचे बचत गट स्थापन करण्यास सुरुवात केली. व याच महिलांच्या सहकार्याने सन 1983 बांगलादेशामध्ये ग्रामीण बँकांची स्थापना केली. जगातील अनेक देशांनी बांगलादेशाचा आदर्श घेऊन स्वयंसहायता महिला बचत गट निर्मितीचे कार्य हाती घेतले. भारतात अशा स्वयंसहायता बचत गट स्थापनेस प्रेरणा मिळाली. स्वयंसहायता गटामुळे गावामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. आणि त्यामुळे बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाले. महिलांचा बचत गटांना बँकांकडून सरकारकडून अनेक योजना प्राप्त झाले आहेत. अनेक योजनांसाठी अनुदाने व कर्ज स्वस्त व्याजदरात उपलब्ध झाले. अनेक महिलांच्या बचत गटांनी वेगवेगळे उद्योग उभारले आहेत. स्वस्त धान्य दुकान, शाळेतील पोषण आहार, पापड तयार करणे,मसाला तयार करणे इ.उद्योगांचे काम या गटातील महिलांना उपलब्ध करून दिल्यामुळे हजारो महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक महिला सदस्यांचे खाते बँकेत उघडण्यात आले. त्यामुळे महिलांना बचतीच्या मुख्य प्रवाहात आणता आले. एकंदरीत देशाचा राष्ट्रीय उत्पन्नात साहजिकच भर पडत आहे.

**बचत गटाचे उद्देश:-**

1) बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे.

2) महिलांचा सुप्त कलागुणांना चालना देणे.

3) महिलांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे.

4) महिलांना आर्थिक सामाजिक व राजकीय विषयक माहिती देणे.

5) महिलांनाशासकीय कार्यालया विषयी माहिती प्राप्त करून देणे.

**स्वयंसहायता बचत गटाची वैशिष्ट्ये :-**

1) स्वयं सहायता बचत गटामुळे लोकांना बचतीची सवय लागते.

2) स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा सामाजिक आर्थिक व राजकीय दर्जा सुधारतो.

3) बचत गटाचा व्याजदर अतिशय कमी असतो.

4) बचत गटाच्या माध्यमातून गरिबी नष्ट करून आर्थिक विकासात वाढ करणे.

5) बचत गटाच्या माध्यमातून गुंतवणूक करून व्यक्तीचे जीवनमान उंचावण्यास मदत होतो.

**सक्षमीकरण म्हणजे काय:-**

सक्षमीकरणाच्या विविध बाजू आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक, राजकीय व आर्थिक सक्षमीकरण होय. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे महिलांमध्ये स्वतःच्या क्षमतेची ओळख, विकास करून आर्थिक सामाजिक राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे. अनेक क्षेत्रात आपली स्वत:ची ओळख सिद्ध करणे होय.

एकंदरीत महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचे आर्थिक सबलीकरण करणे होय.

**स्वयंसहायता बचत गटाची भूमिका :-**

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सामाजिक व राजकीय सक्षमीकरणात दर्शवणाऱ्या काही महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

1) स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक निर्णय घेण्याची व आर्थिक व्यवहार करण्याची संधी प्राप्त झाली.

2) महिलांना पूर्वी चूल आणि मूल ही संकल्पना होती. बचत गटाच्या माध्यमातून स्वाभिमानाने घराचा उंबरठा ओलांडण्यास संधी प्राप्त झाले.

3) समाजातील महिलांना महिला शक्तीचा प्रत्यय आला.

4) महिला स्वावलंबी व आत्मनिर्भर झाले.

5) या बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक राजकीय झाले आहे.

**स्वयंसहायता गटाची कार्यपद्धती :-**

या बचत गटात प्रामुख्याने महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे महिलांचा सार्वजनिक विकास होण्यास मदत होते. स्वतःची विकास तसेच सामाजिक विकास करण्यासाठीमदत होतो. या बचत गटासाठी कमीत कमी दहा किंवा जास्तीत जास्त वीस व्यक्तीने एकत्र येऊन ही बचत गट स्थापन करता येतो. सर्व सदस्यांमधून बचत गटासाठी अध्यक्षाची व सचिवाची निवड केली जाते. त्याचबरोबर त्यांना मदत करण्यासाठी इतर सभासदांची सुद्धा निवड केली जाते. या महिला एकत्रित येऊन नियमित दरमहा ठराविक रक्कम बचत करतात. या सर्व सदस्यांची महिन्यातून एकदा सभा आयोजित केली जाते. या सभेत महिलांच्या बचत गटाच्या समस्या जाणून घेणे एकूण बचतीचे रक्कम जमा करणे सर्व समस्यांचे निराकरण करून योग्य निर्णयात्मक व धोरणात्मक निर्णय घेतला जातो. गरजू सदस्यांना अतिशय कमी स्वस्त दराने अल्पमुदतीचे

कर्ज दिले जातात. या स्वयंसहायता बचत गटासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे कडून तसेच इतर बँकेकडून महत्त्वाची भूमिका बजावली जाते.

**महिला सक्षमीकरणाची आवश्यकता :-**

महिलांचा सामाजिक आर्थिक व राजकीय स्थितीत सुधारणा करण्यासाठी तसेच महिलांना समाजात आदर व सन्मानाने वागणूक प्राप्त करून देण्यासाठी निश्चितच महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. स्त्री पुरुष यांच्यातील असणारे दरी दूर करून समानता साध्य करता येईल. महिलांचे आरोग्य जीवनमान उंचावणे याकरता महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. देशातील सर्वांगीण साधनसंपत्तीचे विकासाकरिता सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. राजकीय व सामाजिक घटकात प्रवेश करण्याकरता सक्षमीकरण करणे गरजेचे आहे.

**भारतातील स्वयंसहायता बचत गटाची प्रगती :-**

भारतात स्वातंत्र्यानंतर देशाचा सामाजिक व राजकीय दारिद्र्य निर्मूलन योजना च्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला. एकात्मिक ग्रामीण विकास योजना सर्वात प्रथम सूक्ष्म वित्त पुरवठा करणारी योजना होती. देशातील गरिबी व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात आले. मात्र ते फारसे उपयुक्त ठरले नाही. म्हणून ग्रामीण व शहरी भागातील महिला विषयक असणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी प्रभावी माध्यम म्हणून या स्वयंसहायता बचत गटांना महत्त्व आहे. भारतामध्ये 1992 मध्ये नाबार्ड तर्फे Asia Pacific Rural and Agricultural Credit Association च्या साह्याने स्वयंसहायता बचत गटाची संकल्पना सुरुवात केली. या सर्व बचत गटात रिझर्व बँक आणि मान्यता दिली. भारतात केरळ तामिळनाडू महाराष्ट्र राजस्थान इत्यादी राज्य आघाडीवर असून नाबार्डच्या माध्यमातून आंध्र प्रदेश या राज्यामध्ये सुद्धा बचत गटाची सुरुवात झाली. ग्रामीण भागातील बचत गटांना आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. रिझर्व बँक ने व्यापारी बँका प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी बँकांना जोडून गटांना आर्थिक मदत करण्यात आले.

**बचत गटाच्या समस्या :-**

1) **अकार्यक्षमता** :- बचत गटातील सदस्य एकमेकांच्या आदेश किंवा नियमाचे काटेकोरपणे पालन करत नाहीत. म्हणजेच कधीकधी मनमानी कारभार चालतो. त्यामुळे सदस्यांमध्ये अकार्यक्षमता दिसून येते.

2) **थकबाकीचे प्रमाण जास्त :-** बऱ्याच बचत गटातील सदस्याने कर्जाचे वाटप केले. परंतु कर्ज थकबाकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. वसुली मात्र केलेच नाही. त्यामुळे थकबाकीचे प्रमाण मोठ्या स्वरूपात दिसून येतो.

3) **वशिलेबाजी :-** बचत गटातर्फे कर्ज वाटप करताना नातेवाईक मित्र व वशिलेबाजीचा प्रमाण मोठ्या स्वरूपात दिसून येतो. आपल्या जवळच्या व्यक्तीला कर्जाचे वाटप केले जाते. बऱ्याचदा व्यक्ती भेद सुद्धा केला जातो.

4) **बचत गटातील कामकाज अनियमितपणा :-** बचत गटाचे दरमहा सभा घेणे, तसेच सर्व कागदपत्रे, रेकॉर्ड हिशोब व्यवस्थितपणे ठेवले जात नाही. तसेच सर्व सभासद नियमित मीटिंगसाठी उपस्थित राहत नाही. त्यामुळे कामकाज मध्ये अनियमितपणा दिसून येतो.

5) **निधीमधील कमतरता :-** बचत गटातील सर्व सदस्यांनी ठरवून दिलेली निधी वेळेवर देत नाही. म्हणजेच सदस्यांमध्ये नियमितपणा दिसून येत नाही. निधी गोळा करत असताना अनेक अडचणी येतात. अनेकदा त्यामध्ये दिरंगाई केली जाते. निधीची कमतरता बऱ्याच वेळी जाणवते.

6) **अनावश्यक खर्चात वाढ :-** बचत गट हे ग्रामीण भागात असल्यामुळे तालुका जिल्ह्याच्या ठिकाणी बऱ्याच वेळा कामकाजासाठी जावं लागतो. त्यासाठी येणारा खर्च मोठ्या प्रमाणात आहे. बऱ्याच बचत गटांना तो परवडणारा नसतो. शासकीय कार्यालय बँकांच्या कार्यालयीन खर्च मोठ्या प्रमाणात असतो.

7) **सदस्यांचे गैरहजेरीचे प्रमाण जास्त :-** मासिक सभेला बऱ्याचदा अवेळी आणि अयोग्य ठिकाणी घेतल्या जातात. त्यामुळे सदस्यांचे गैरहजेरीचे प्रमाण वाढते.

**उपाययोजना :-**

**1) बँकांचे योगदान :-** स्वयंसहायता बचत गटाच्या सार्वजनिक विकासाची जबाबदारी संबंधित बँकांनी घेतली पाहिजे. त्याकरता सर्व मदत संबंधित बँकांनी बचत गटांना करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लोक अशिक्षित असतात त्यामुळे बँकांनी त्यांना योग्य मदत केली पाहिजे. प्रसंगी त्यांना प्रशिक्षण देणे सुद्धा आवश्यक आहे.

**2) शासनाकडून अर्थसहाय्य :-**

बचत गटांना शासनाकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य देणे आवश्यक आहे. कारण बचत गटांचे निधीची रक्कम कमी प्रमाणात असतो. कोणतेही भरीव काम करण्यासाठी निधी अपुरी पडते. त्याकरिता शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणे आवश्यक आहे.

**3) मार्गदर्शन व सल्ला:-** स्वयंसहायता महिला बचत गटातील बरेचसे प्रमाणात सदस्य अशिक्षित असतात. त्यामुळे त्यांना मार्गदर्शनाचे खूप गरज असते. तसेच बऱ्याचशा बचत गट तोट्यात गेले आहेत. अशा बचत गटांना योग्य सल्ल्याची गरज आहे. त्याकरता शासनाकडून योग्य वेळी मार्गदर्शन व सल्ल्याची गरज आहे.

**4) शासकीय यंत्रणेची सोय :-**

बचत गटाच्या अनेक समस्या असतात. तसेच वेगवेगळ्या बचत गटाचे अनेक भिन्न भिन्न समस्या त्या विभागाकरिता वेगवेगळ्या असतात. त्यामुळे स्थानिक तालुका जिल्हा इ.ठिकाणी तक्रार निवारण केंद्र तसेच शासकीय एखादी यंत्रणा उभारली पाहिजे. शासकीय यंत्रणामुळे ग्रामीण भागातील बचत गटांना मदत होतो.

**5) थकबाकीचे प्रमाण कमी :-**

स्वयंसहायता बचत गटातील अनेक बचत गटाचे थकबाकीचे प्रमाण खूप मोठ्या स्वरूपात पहावयास मिळते. बचत गट बंद पडतात. यासाठी सरकारकडून व स्थानिक प्रतिनिधी यांनी योग्य नियमावली तयार करून अंमलबजावणी केली पाहिजे. थकबाकी योग्य वेळेत वसुली केल्यामुळे बचत गटामध्ये मोठ्या प्रमाणात निधी जमा होते. व बचत गटातील व्यक्तींना वाटप करता येतो.

अशाप्रकारे बचत गटाचा सर्वांगीण विकासाकरिता योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. या बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाची संकल्पना साध्य करता येतो.

**निष्कर्ष :-**

स्वयंसहायता बचत गटामुळे दारिद्र्याचे निर्मूलन करून ग्रामीण भागातील महिलांमध्ये रोजगाराची संधी निर्माण करून स्वावलंबनाची जाणीव निर्माण करून ग्रामीण व शहरी भागातील महिलांचे राणी मनाचा दर्जा उंचावण्यात मदत झाले. बचत गटामुळे महिलांचे आर्थिक सामाजिक व राजकीय दर्जामध्ये सुधारणा होत आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणात भर पडत आहे. या बचत गटामुळे ग्रामीण भागातील महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे. ग्रामीण भागातील महिलांमधील दारिद्र्य दूर होण्यास मदत झाले आहे. बचत गटाच्या मदतीने महिलांना आर्थिक आधार मिळाला आहे. निश्चितच या स्वयंसहायता बचत गटामुळे महिला सक्षमीकरण झाले आहे.

## संदर्भसूची :-

1) भोसले काटे (2012) भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

2) आढाव विलास (2019) महिला सबलीकरण,पुणे विद्यापीठ,पुणे.

3) मुलांनी एम यू (2006) अल्पबचत नियोजन,डायमंड पब्लिकेशन,पुणे.

4) महिला बचत गट मार्गदर्शिका चौधरी लॉ पब्लिशर्स जळगाव.

5) ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार वार्षिक रिपोर्ट (2013-2014)